Impact Factor – 6.625 Special Issue - 225 Feb. 2020 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-research Journal


# Role of Judiciary in Reinforcing Indian Democracy

Organized by

Political Science Department

**Women's College of Arts & Commerce**

310 B, New Nandanvan, Nagpur - 440 009



■ EXECUTIVE EDITOR ■

**Dr. Sampada S. Kullarwar**

■ ASSOCIATE EDITOR ■

**Dr. Sandip Tundurwar** ■ **Dr. Santosh Dakhare** ■ **Dr. Anjali Gaidhane**

■ CHIEF EDITOR ■

**Dr. Dhanraj T. Dhangar**

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

**For Details Visit To :** www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Off. Principal
Late. N.P.W. College
Distt. Bhandara

Late N. P. W. College Lakhani Distt. Bhandara
Ref No.
Dt.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625
Special Issue 225 : Role of Judiciary in Reinforcing Indian Democracy
ISSN : 2348-7143
Feb. 2020

# भारतीय लोकशाही व न्यायव्यवस्था

प्रा. यु.पी.नहारे,
राज्यशास्त्र विभाग प्रमुख तथा रासेयो प्रमुख
स्व. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महा. लाखनी

साम्राज्यशाही विरोधी भारतीय स्वातंत्र्य लढयाच्या काळात ध्येयवादाच्या आधारे काही उद्दिष्टांची घोषणा करण्यात आली होती आणि त्यातून लोकांना सहभागाचे आवाहन केलेले होते, त्या आवाहनानुसार लोकसहभागाचा प्रचंड प्रमाणात प्रतिसादही मिळू लागला होता. परंतु साम्राज्यवादी सत्ता संपल्यानंतर जो सत्ताप्रकार स्वीकारण्यात आला त्या प्रकाराने घोषित उदिष्टांची मात्र पूर्तता होऊ शकली नाही, असे सांगणाऱ्या विचारप्रवाहामुळे लोकमन दुबळे झाले असले तरी, भारतात आपले स्वातंत्र्य आणि आपली लोकशाही आजही कायम टिकून आहे. जनसंपर्क वाढल्यामुळे 'लोकशाही' ही संकल्पना केवळ शासनाचा प्रकार ठरली आहे.

लोकशाहीचा सर्व साधारण अर्थ जनतेची सत्ता असा होतो. इंग्रजी ग्रीक शब्द डेमॉस म्हणजे लोक आणि क्रेटिया म्हणजे सत्ता या दोन शब्दांनी मिळून (Domacracy) लोकशाही हा शब्द तयार झालेला असून क्रमशः जनता आणि सत्ता या दोन घटकांशी संबंधित असा अर्थ घेतल्या जातो. जोपर्यंत हे दोन्ही घटक शासन, राज्य आणि समाज या तिन्हींच्या परस्पर आंतरिक संबंधाना समजून घेत नाही, तोपर्यंत लोकशाही या संकल्पनेची व्याख्या करणे अवघड आहे.

आधुनिक औद्योगिक उत्पादन व्यवस्थेवर आधारित समाजव्यवस्था ब्रिटिश साम्राज्य सत्तेत सुरू झाली. भारतासारख्या खंडप्राय देशावर ब्रिटनमधून राज्य चालवायचे आणि बाजारपेठ व औद्योगिक उत्पादन चालू ठेवायचे असेल तर संसदीय लोकशाही काही प्रमाणात चालू ठेवली पाहिजे, या ब्रिटिशांच्या मुत्सद्दी धोरणतूनच स्थानिक कारभारात भारतीय लोकप्रतिनिधींच्या सहभागाची तरतूद करणाऱ्या उपायात्मक योजना करण्यात आल्या. तेथील संसदीय लोकशाही भारतीयांच्या मनात रूजवण्याचे प्रयत्न सुरू झाले आणि टप्प्याटप्प्याने भारतात लोकशाही विकसित होऊ लागली. लोकशाही तत्वानुसार राज्यव्यवस्थेचा उपयोग कोणत्याही एका व्यक्तीकरिता किंवा गटाकरिता न करता सर्व लोकांच्या हिताच्या दृष्टीने झाला पाहिजे तसेच ती व्यवस्था सर्व लोकांप्रती जबाबदार असली पाहिजे. लोकशाही तत्वानुसार राज्याची सक्ती मान्य असून समाजहिताच्या दृष्टीने व्यक्ती स्वातंत्र्याला काही मर्यादा असल्याच पाहिजेत मात्र व्यक्तीच्या व्यक्तिगत जीवनातील राज्याचा हस्तक्षेप, व्यक्ती स्वातंत्र्यावर राज्याने घातलेल्या मर्यादा या विरंचीत स्वरूपाच्या असाव्यात.

लोकशाही राज्य याचा अर्थ जनता सार्वभौम असून तिचे शासनावर अंतिम व सर्वोच्च नियंत्रण राहणे होय. तसेच जनतेचे स्वातंत्र्य, समता, अधिकार व न्याय यांच्या रक्षणाची जबाबदारी राज्यावर असते.

**लोकशाहीचा उदय व विकास –**

आज लोकशाही ही संकल्पना लोकप्रिय झालेली असून जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी लोकशाही तत्वाचा स्वीकार केलेला आहे. प्रचलित युग हे लोकशाही प्रभावाचे मानले जाते. मात्र लोकशाही स्वरूप हे समाजपरत्वे भिन्न दिसून येते. आज व्यापक प्रमाणात लोकशाहीचे समर्थन आणि स्वीकार होत असला तरी हा एक प्राचीन शासन प्रकार आहे. इ.स. पूर्व ७०० च्या दरम्यान ग्रीक नगर राज्यात लोकशाहीचा उदय झाला अशी काही प्राचीन राजकीय विचारवंतांनी नोंद केलेली आहे. तर काहींच्या मते लोकांच्या निर्मितीबरोबरच लोकशाही प्रवृत्ती आणि व्यवस्था निर्माण झाली. एक शासन प्रकार म्हणून लोकशाही व्यवस्था उदयास आल्यानंतर मात्र लोकशाहीचे स्वरूप व्यापक होत गेले. आणि निरनिराळया नावांनी लोकशाही शासन प्रकार ओळखल्या जाऊ लागला. लोकशाहीची एक व्यवस्था, एक संकल्पना, एक प्रवृत्ती, एक दृष्टिकोन, एक जीवनमार्ग, एक विचारप्रणाली अशी विविध रूपे विकसित झाली.

लोकशाहीस जनतंत्र, प्रजातंत्र, लोकतंत्र, जनशाही, जनसत्ता, पक्षीय तंत्र इत्यादी संकल्पनांनी संबोधले जाते. राष्ट्र राज्याच्या उदयानंतर निरंकुश राज्याच्या सत्तेविरूध्द सर्वप्रथम इंग्लंडनंतर फ्रान्स व युरोपातील अन्य देशात विविध कारणांवरून संघर्ष झाले, त्यातूनच लोकशाहीचा आधुनिक विचार उदयास आला असेही म्हटले जाते. लोकशाही व्यवस्थेला आज सर्वत्र समर्थन असून कुठेही प्रखर विरोध आढळत नाही. प्रत्येक राष्ट्र स्वतःस लोकशाही शासन मानण्यात धन्य समजतात. पाश्चात्य देशातील लोकशाही संबंधी विचार आणि साम्यवादी देशाचे विचार यातील संघर्ष हा लोकशाही संबंधीचाच होता. दुसऱ्या महायुध्दानंतर सर्वत्र लोकशाहीचे समर्थन करण्यात आले. नवस्वतंत्र राष्ट्र लोकशाही शासन व्यवस्था स्वीकारण्यास स्वतःचा गौरव समजतात. लोकशाहीच्या नावावर विविध संस्था आणि सिध्दांताचे समर्थन करण्यात येते.

राष्ट्र राज्याच्या परस्पर संघर्षामुळे जनतेची सत्ता ही संकल्पना उदयास आली असेही म्हणावे लागेल. जॉन लॉक म्हणतो की, शासन जनतेच्या संमतीवर आधारित असले पाहिजे व त्याला विरोध करण्याचा अधिकार जनतेला असला पाहिजे. जॉन लॉकचे हे वैचारिक संकल्पनेचे राजकीय तत्वज्ञान आहे. अठराव्या शतकात रूसोने जनतेच्या सार्वभौम सत्तेचा सिध्दांत मांडला. तर जेफरसन म्हणतो की, जनतेला क्रांतीचा अधिकार असतो. या वैचारिक प्रक्रियेतून जनतेच्या सार्वभौम सत्तेची संकल्पना विकसित होऊन फ्रेंच क्रांतीतून उदयास



Offi. Principal
Late. N.P.W. College
Lakhani Distt. Bhandara
Late N.P.W. College, Lakhani, Distt. Bhandara
Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
Feb. 2020

आलेले स्वातंत्र्य व समतेचे तत्व आणि औद्योगिक क्रांतीतून उदयाला आलेली भांडवलशाही विषमता आणि शोषण, अन्याय या परस्परविरोधी प्रवृतींच्या परिणाम स्वरूप जहाल क्रांतीकारक विचारसरणीचा उदय झाला. तसेच सुख आणि न्याय यांचा पुरस्कार करणारी उदारमतवादी लोकशाही संकल्पना देखील विकसित झाली. दोन्ही तत्व राज्य, शासन, समाज व्यवस्था, राजकीय मूल्ये, राजकीय नियंत्रण इत्यादींचा भिन्न दृष्टीने विचार करतात. मात्र व्यक्तीचे सुख व नय हे अंतिम साध्य मानून यातून त्याला स्वत:चा विकास करून घेणे शक्य व्हावे अशी स्थिती निर्माण करणे हेच लोकशाहीचे उद्दिष्ट असते. त्यामुळे लोकशाही ही अत्यंत व्यापक संकल्पना आहे.

**लोकशाहीचा अर्थ आणि व्याख्या –**

प्राचीन काळापासून लोकशाही हा शासन प्रकार मानला गेलेला असून ग्रीक विचारवंत आणि राज्यशास्त्राचा जनक असलेल्या ॲरिस्टॉटल याने लोकशाहीला एक शासन प्रकार म्हणून संबोधित केले आहे. लोकशाही हाच आधार गृहीत धरून अनेक विचारवंतांनी लोकशाहीचा अर्थ खालील व्याख्यांद्वारे स्पष्ट केलेला आहे.

१) प्राचीन ग्रीक विचारवंत हेरोडोटस यांनी लोकशाहीची पहिली व्याख्या केली. त्यांच्या मते, ''लोकशाही हा असा शासन प्रकार आहे की, ज्यात राज्याची सर्वोच्च सत्ता लोकांच्या हाती असते.''

२) अब्राहम लिंकन, ''लोकांनी, लोकांचे व लोकांसाठी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय.'' (Government of the people, by the people, for the people) ही जगप्रसिध्द लोकशाहीची व्याख्या अब्राहम लिंकनने केली आहे.

३) प्रा. सिली, ''प्रत्येकालासहभाग घेण्याची संधी मिळणारे शासन म्हणजे लोकशाही होय.''

४) डॉ. बेनीप्रसाद, ''लोकशाही ही अशी जीवनपध्दती आहे ज्यात कोणत्याही व्यक्तीला आपले सुख साध्य करण्यासाठी इतर व्यक्तींचे साधन बनविता येत नाही.''

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, भारतातील राजकीय लोकशाही ही स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुता या तीन तत्त्वांवर आधारली असावी, म्हणजे तिचे सामाजिक लोकशाहीत रूपांतर करावयास हवे. तसेच ते पुढे म्हणतात, की ''आपल्या राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रूपांतर केले पाहिजे. राजकीय लोकशाहीचा पाया सामाजिक लोकशाहीवर भक्कमपणे आधारित असल्याशिवाय राजकीय लोकशाही टिकत नाही. पण सामाजिक लोकशाही म्हणजे नेमके काय? समता, स्वातंत्र्य व विश्वबंधुत्व या तत्त्वावर आधारलेला जीवनमार्ग म्हणजे लोकशाही होय. ही तीन तत्वे वेगवेगळी मानता कामा नये, त्यांचा त्रिवेणी संगम आहे. त्यापैकी एक तत्व वगळणे म्हणजे लोकशाहीच्या मुळ हेतूस-सुरूंग लावल्यासारखे आहे.'' ही तिन्ही तत्त्वे व्यक्तीला सामाजिक बंधनातून मुक्त अशी सामाजिक रचना निर्माण करण्यात मदत करतात. सर्वांना समान संधी व सर्वांचे हितसंबंध साध्य होण्यासाठी योग्य सुसंवाद निर्माण होणे गरजेचे असून त्याद्वारे मानवी हक्कांचे संरक्षण शक्य होते. त्यासाठी संसदीय लोकशाही पध्दतीचा त्यांनी पुरस्कार केला.

**लोकशाहीची मूलभूत तत्वे/आधुनिक लोकशाहीचे मूलभूत आधार –** लोकशाही संकल्पना समजून घेण्यासाठी केवळ शासन पध्दतीचा विचार न करता संपूर्ण समाज, राज्य व मूल्ये यांचा विचार करणे आवश्यक आहे त्यासाठी खालील तत्वे महत्वाची मानल्या गेलीत.

१) **राजकीय स्वातंत्र्य व समता –** स्वातंत्र, समता, बंधुता ही लोकशाहीची मुख्य मूल्ये मानली गेली असून मानवाधिकाराच्या घोषणपत्रात नमूद केले आहे की,''आपल्या अधिकाराबाबत सर्व माणसे जन्मत: मुक्त व समान आहेत व ते तसेच राहतील.'' व्यक्तीला मिळालेल्या स्वातंत्र्यात व्यक्तिस्वातंत्र्यासोबतचे अभिव्यक्ती, विचार, कृती, उच्चार, जीवित, मतस्वातंत्र्य इत्यादींचाही समावेश होतो. मत स्वातंत्र्यामुळेच शांततामय परिवर्तन शक्य होते. क्रांती कट-कारस्थाने इत्यादींची गरज भासन नाही. तर व्रिघातक कृती विरूध्द विधायक कृतीचे समर्थन करण्यासाठी संप, निदर्शने, घेराव, मोर्चे, निवेदन इत्यादी माध्यमातून कार्य केले जाते.

२) **धोरण निर्धारकाचे लोकशाही नियंत्रण –** भारतात पंचायत राज व्यवस्थेनुसार ग्रामपंचायत ते राष्ट्रीय पातळीवर प्रातिनिधीक लोकशाहीचा अवलंब केलेला असून ग्राम, राज्य आणि राष्ट्रीय या तिन्ही क्षेत्रातील कार्य क्षेत्र प्रचंड प्रमाणात वाढलेले आहे आणि विविध माध्यमांद्वारे धोरण निर्धारण करणाऱ्या सर्वोच्च सत्ता केंद्राचे नियंत्रण करण्याचा प्रयत्न लोकशाहीत केल्या जातो. उदा. संविधानाची सर्वोच्चता, स्वतंत्र न्यायव्यवस्था, गुप्त मतदान, समान प्रतिनिधित्व, प्रभावी राजकीय पक्ष, जबाबदारीचे तत्व, लोकमताच्या प्रभावानुसार स्वतंत्र वातावरणातील विशिष्ट, निश्चित काळाने होणाऱ्या निवडणुका इत्यादी घटकांची भूमिका धोरण निर्धारणात अतिशय महत्वपूर्ण ठरते.

३) **बहुमताला प्राधान्य –** बहुमताचा अर्थ केवळ निवडणुकांमधील किंवा विधीमंडळातील बहुमत असा होत नसून सार्वजनिक क्षेत्रातील, प्रातिनिधीक स्वरूपाचे निर्णय घेणारे मतैक्य किंवा एकमत शक्य नसल्यास बहुमताचा अवलंब केल्या जातो. बहुमताचे स्वरूप हे परिस्थितीजन्य समस्यांनुसार बदलू देखील शकते. लोकशाहीत सर्व लोक समान असून सर्वांना समान अधिकार असले तरी प्रत्यक्ष निर्णयाचे वेळी नेहमीच एकमत होईल असे नाही. त्यामुळे एखाद्या विशिष्ट प्रश्नाबद्दल परिस्थितीनुसार ज्या बाजूने बहुमताचा निर्णय असेल त्यानुसार निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करणे योग्य ठरते. या तत्वानुसार


Principal
N.P.W. College
Distt. Bhandara

लोकशाहीव्यवस्थेत विरोधी विचारांचा सन्मान केल्या जातो व बहुमताचा आदर केल्या जातो.

४) **जनतेचे सार्वभौमत्व** – लोकशाही तत्वानुसार राज्य हे जनतेच्या सार्वभौमत्वाच्या सिध्दांतावर आधारित आहे. सार्वभौम जनतेचा योग्य अर्थ असा की जनता स्वत:च्या अधिकार व स्वातंत्र्याविषयी जागृत असून तिच्यावर कोणताही अनिष्ट वैचारिक प्रभाव नाही. ही व्यक्ती पूजेला प्राधान्य न देता भ्रामक आणि गैरप्रचाराला बळी पडत नाही. विवेकाने वस्तुनिष्ठ पध्दतीने विचार करून बदलत्या परिस्थितीनुसार नवे परिवर्तन स्वीकारण्यास तयार असते. जनता आपल्या प्रतिनिधीमार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सार्वभौमसत्तेचा वापर करीत असते. त्यामुळे विवेकी व्यक्तींचा सर्वांगीण विकास साधणे हे लोकशाही शासनाचे प्रथम साध्य व उद्दिष्ट आहे आणि त्याला लोकशाही शासन हाच एकमेव उपाय आहे.

५) **शांततेच्या मार्गाचा अवलंब** – संविधानात्मक मार्गाने शासनात व शासकीय निर्णयात बदल करण्याची व्यवस्था लोकशाहीत असते. लोकशाही सिध्दांतात महत्वाचे आधारभूत तत्व म्हणजे शांततेच्या मार्गाचा अवलंब करून बहुमत लक्षात घेतले जाते व प्रश्न सोडवले जातात. अशावेळी अल्पसंख्य गट किंवा विरोधी गट बहुमताचा निर्णय मान्य करतात. तेव्हा लोकशाही व्यवस्थेत क्रांतिकारक किंवा विरोधी गैर मार्गांना कुठेही स्थान नसते.

**लोकशाहीचे प्रकार** – मुख्यत: लोकशाहीचे दोन प्रकार पडतात.

१) प्रत्यक्ष लोकशाही, (२) अप्रत्यक्ष लोकशाही

**१) प्रत्यक्ष लोकशाही** – प्रत्यक्ष लोकशाहीत शासन प्रतिनिधीमार्फत होत नसून जनता स्वत:च शासन कार्यात भाग घेत असते. शासन व जनता यांच्यात प्रत्यक्ष सुसंवाद साधल्या जातो, अशा लोकशाहीचे स्वरूप आजही स्वित्झलँडच्या काही कॅन्टॉन्समध्ये आढळते.

**२) अप्रत्यक्ष लोकशाही किंवा प्रातिनिधिक लोकशाही** – राज्यांचा वाढता विस्तार, वाढती लोकसंख्या आणि क्षेत्रफळाचा विस्तार या कारणांमुळे प्रत्यक्ष लोकशाहीचा अवलंब आधुनिक काळात करणे अशक्य आहे आणि म्हणूनच त्याला पर्यायी व्यवस्थेच्या स्वरूपात प्रातिनिधिक पध्दतीची अप्रत्यक्ष लोकशाही आधुनिक राज्यांनी स्वीकारली आहे.

डब्ल्यू. एफ. विलोबी हे अप्रत्यक्ष लोकशाहीचे स्पष्टीकरण देतांना म्हणतात की, ''अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधीक शासन म्हणजे असा शासन प्रकार की, ज्यात सार्वभौम जनता राज्ययंत्रणेला प्रत्यक्ष मार्गदर्शन अथवा प्रशसकीय कृती न करता शासकीय घटकांच्या मार्फत आपल्या सार्वभौम सत्तेचा वापर करतात.'' जनता आपल्या प्रतिनिधीद्वारा शासन कार्यात सहभाग घेत असते आणि आपल्या अपेक्षा अंमलात आणत असते. अप्रत्यक्ष लोकशाहीचे अभ्यासाच्या दृष्टीने दोन प्रकार पडतात. १) पारंपारिक प्रातिनिधीक लोकशाही आणि २) अत्याधुनिक प्रातिनिधीक लोकशाही

१) पारंपारिक प्रातिनिधीक लोकशाहीचे दोन प्रकार खालील प्रमाणे –

अ) सांसदीय लोकशाही, ब) अध्यक्षीय लोकशाही

**अ) सांसदीय लोकशाही** – यालाच जबाबदार शासन पध्दती असे देखील म्हटले जाते. इंग्लंडमध्ये विकसित झालेल्या संसदीय पध्दतीत सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या आधारे जनता आपले प्रतिनिधी निवडते, त्यांनाच संसद सदस्य किंवा खासदार असे म्हणतात. संसद ही सार्वभौम असून संसदेद्वारे म्हणजेच प्रतिनिधीद्वारे कार्यपालिकेची निवड केली जाते. या संसदीय स्वरूपात राज्यप्रमुख हा नाममात्र असतो तर पंतप्रधान हा वास्तविक प्रमुख असतो. उदा. इंग्लंडमधील राणी किंवा राजा तसेच भारतातील राष्ट्रपती. संसदेत बहुमत प्राप्त केलेला राजकीय पक्ष किंवा पक्षांचा गट सत्ता प्राप्त करतो. बहुमत असलेल्या राजकीय पक्षाचा किंवा पक्ष गटांचा संसदीय नेता हा पंतप्रधान म्हणून नियुक्त केल्या जातो. मंत्रिमंडळ आपल्या कार्याकरिता संसदेला संयुक्तिकरित्या जबाबदार असते. संसदेत अविश्वासाचा ठराव मान्य झाल्यास पंतप्रधान वा मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. संसदेच्या बहुमताचा पाठिंबा असेपर्यंतच पंतप्रधान व मंत्रिमंडळ अधिकार पदावर असते. अनेक देशात या संसदीय पध्दतीचा स्वीकार केलेला आहे.

**(ब) अध्यक्षीय लोकशाही** –

अठराव्या शतकात अमेरिकेत अध्यक्षीय शासन पध्दतीचा उदय झाला, अध्यक्षीय प्रणालीत राष्ट्राची कार्यकारी किंवा वास्तविक सत्ता राष्ट्राध्यक्षाच्या निवडीसाठी मतदान करते. अध्यक्ष आपले सेक्रेटरी किंवा मंत्रिमंडळ स्वत:च्या मर्जीने नियुक्त करतो. अध्यक्ष व त्याचे सेक्रेटरी हे कायदेमंडळाचे सदस्य नसतात. कारण अध्यक्षीय शासन प्रणालीत सत्ता विभाजनाचे तत्व स्वीकारलेले असल्याने कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ परस्परापासून वेगळे ठेवलेले आहे. अध्यक्षीय पध्दतीत राष्ट्राध्यक्षाचा कार्यकाल निश्चित असतो. अध्यक्षावरील महाभियोगाच्या ठरावाचा अपवाद वगळता संविधानाने निश्चित केलेला कार्यकाल संपल्याशिवाय राष्ट्राध्यक्षीला सत्तेवरून कोणीही पदच्यूत करू शकत नाही. या पध्दतीत संविधान हे सर्वश्रेष्ठ असून शासनाच्या तिन्ही विभागास या संविधानात्मक चौकटीतच कार्य करावे लागते. येथे न्यायव्यवस्था पूर्णपणे स्वतंत्र व अधिकारयुक्त असते. जगातील अनेक देशांनी अध्यक्षीय लोकशाहीचा स्वीकार केलेला आहे.

**भारतीय न्यायव्यवस्था** – भारतीय न्यायव्यवस्था ही एकेरी न्यायव्यवस्था आहे. ब्रिटीश कालखंडात ब्रिटीशंनी निर्माण केलेल्या रचनेप्रमाणे भारताने न्यायव्यवस्था स्विकारली आहे. १९३५ च्या भारतीय संघराज्यांच्या कायद्याने २६ जानेवारी १९५० रोजी दिल्ली येथे



Late. N.P.W. College, Lakhani, Distt. Bhandara
Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara
Late. N.P.W. College
Scanned with CamScanner

सर्वोच्च न्यायालयाची स्थापना झाली. भारतीय न्यायव्यवस्थेची रचना पुढील प्रमाणे आहे. शिरोभागी सर्वोच्च न्यायालय, त्यानंतर विभागीय पातळीवर खंडपीठे, त्यानंतर जिल्हा पातळीवर जिल्हा न्यायालय तर तालुका पातळीवर तालुका न्यायालय घटना कलम १२४ नुसार सर्वोच्च न्यायालयाची निर्मिती करण्यात आली आहे.

**न्यायव्यवस्थेची रचना –**

**१) न्यायाधीशांची संख्या –** सर्वोच्च न्यायालयामध्ये एक मुख्य न्यायाधिश आणि नव्याने तरतूद केल्याप्रमाणे इतर ३० न्यायाधिश असतात. न्यायाधिशांची संख्या कमी जास्त करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे.

**२) न्यायाधिशांची नेमणूक –** सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधिशांची नेमणूक राष्ट्रपती स्वतःच्या सहीने करतो. मात्र इतर न्यायाधिशांची नेमणूक करतांना राष्ट्रपती सरन्यायाधिशांचा सल्ला घेतो.

**३) न्यायधिशांची पात्रता –**

१. तो भारताचा नागरिक असावा

२. त्याने कमीत-कमी पाच वर्ष उच्च न्यायालयात न्यायाधिश म्हणून काम केलेले असावे.

३. कमीत-कमी दहा वर्षापर्यंत एक किंवा जास्त न्यायालयात वकिली केलेली असावी.

४. राष्ट्रपतीच्या मते तो कायदेपंडित असावा.

**४) कार्यकाल –** वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत तो पदावर राहतो किंवा तत्पूर्वी तो आपल्या स्वइच्छेने राष्ट्रतीकडे राजीनामा देतो.

**५) शपथविधी –** कलम १२४/६ नुसार तिसऱ्या परिश्ष्टित दिलेल्या नियमानुसार भारताचा राष्ट्रपती शपथ देतो.

**६) पदमुक्ती –** कोणताही न्यायाधिश गैरवर्तन व अकार्यक्षम या कारणावरून बडतर्फ करण्याचा अधिकार भारताच्या राष्ट्रपतीला आहे, असे करण्यापूर्वी संसदेच्या प्रत्येक सभागृहाने २/३ बहुमताने तसा ठराव पास करणे आवश्यक आहे.

**७) निवृत्तीनंतर व्यवसाय करण्यास बंदी घालण्यात आली आहे –** सर्वोच्च न्यायालयातील कोणत्याही न्यायधीशाला सेवानिवृत्तीनंतर भारतातील कोणत्याही न्यायालयात वकिली करता येणार नाही कारण श्रेष्ठ न्यायाधिश जर वकिली करू लागले तर संबधित न्यायाधिशांवर दबाव येऊ शकतो.

**सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र –** कायदेतज्ञांच्या मतानूसार भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला जगातील कोणत्याही सर्वोच्च न्यायालयापेक्षा व्यापक अधिकार प्राप्त झाले आहे. ते पुढीलप्रमाणे आहेत.

**१) प्रारंभीक अधिकार क्षेत्र –** ज्या खटल्यांची सुरवात फक्त सर्वोच्च न्यायालयातच होते त्याला प्रारंभीक अधिकार क्षेत्र असे म्हणतात. पुढीलपैकी खटले फक्त सर्वोच्च न्यायालयातच चालतात.

१) भारत सरकार आणि घटकराज्य सरकार त्यांच्यातील वाद.

२) घटकराज्यातील वाद

३) केंद्रसरकार आणि राज्यसरकारचा कायदेविशयक प्रश्न

४) मूलभूत अधिकारांचे संरक्षण इत्यादी.

**२) पुनर्निर्णयाचे अधिकार क्षेत्र –** भारतीय उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर पुनर्निर्णय देण्याचा अधिकार फक्त सर्वोच्च न्यायालयाला आहे.

**३) परमार्शदायी अधिकार –** कलम ४३ नुसार भारताच्या राष्ट्रपतीला कायदेविषयक सल्ला सर्वोच्च न्यायालयाकडून घेण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.

**४) अभिलेख न्यायालय –** १२९ व्या कलमानुसार सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय आहे. त्याला त्या न्यायालयाच्या बेअब्रुकरीता शिक्षा करण्याचे अधिकार मिळाले आहेत.

**५) मूलभूत अधिकारांचे संरक्षण –** देशातील नागरिकाला मिळालेल्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायांलयाला प्राप्त झालेला आहे.

**निष्कर्ष –**

वरिल प्रमाणे भारतीय लोकशाही शासन पध्दतीत न्यायव्यवस्थेच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाला अधिकारक्षेत्र प्राप्त झाले असले तरी भारतीय लोकशाही शासन पध्दतीत सर्वोच्च न्यायालयानुसार आज आपणाला सर्वेक्षणेपासुन सावध रहावे लागत आहे. जसे, उदा. बेकारी-बेरोजगारी, न्याय-अन्याय, अत्याचार, भ्रष्ट्राचार, बलात्कार इत्यादी बाबींचा सामना करावा लागत आहे. बलात्कारानंतर न्याय हा प्रत्येक नागरिकांना उशिरा प्राप्त होत असतो, असे जरी असले तरि भारतीय लोकशाही शासन पध्दती व न्यायव्यवस्था योग्य आहे असे आजच्या नविन विधानसभा निवडणुकीनंतर सर्वांना न्याय मिळेल असे काही प्रमाणात कळले आहे हे आज भारतीय लोकशाही शासन पध्दतीत प्रत्येक नागरिकांना न्याय, स्वातंत्र्ये, समता, बंधुता या तत्वांमुळे आपल्याला विसरता येत नाही.

**संदर्भग्रंथ**



Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

Late N. P. W. College, Lakhani
Ref No.
Dt.
Distt. Bhandara

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor - (SJIF) – 6.625**
**Special Issue 225 :** Role of Judiciary in Reinforcing Indian Democracy
**ISSN :** 2348-7143
**Feb. 2020**

संदर्भ

१) डॉ. अलका देशमुख, भारतीय लोकशाही प्रक्रिया, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर
२) डॉ. विनोद गायकवाड, भारतीय लोकशाहीतील स्थित्यंतरे, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर.
३) डॉ. अलका देशमुख, स्थानिक स्वशासन, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर.
४) रा. ज. लोटे, राज्यशस्त्रीय सिध्दांत, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स प्रकाशन नागपूर
५) रा. ज. लोटे, भारतीय शासन आणि राजकारण, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नगपूर
६) https://m.maharashtratime.com

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

Late N.P.W. College, Lakhani, Distt. Bhandara
Ref No.
Dt.



Scanned with CamScanner